संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# परीक्षा मंडळाची गुणवत्ताच घसरते आहे

**निकालांमधले** गोंधळ हा आता जणुकाही परिपाठ होऊ लागला आहे.दहावी बारावी , पदवी, पदव्युत्तर अशा सगळ्याच परीक्षामध्ये काही ना काही निमित्ताने निकालांविषयीची नाराजी पुढे येत असते. त्यावेळीसुध्दा बारावीच्या सर्व शाखांच्या निकालाबाबत विद्यार्थ्यांमध्ये नाराजी आहे. एकुणच यावेळेला यशस्वी होणाऱ्या विद्यार्थ्यांचा टक्का खाली आला. त्यातही विज्ञान शाखेतल्या विद्यार्थ्यांना बराच मोठा फटका बसलेला दिसतो. अनपेक्षितपणे अनेक विद्यार्थ्यांची टक्केवारी खाली आली तर अनेक विद्यार्थ्यांना अपेक्षित तेवढे गुण मिळालेले नाहीत. गेल्या दोन दिवसात एकट्या मुंबई विभागात जवळपास तीन हजार विद्यार्थ्यांनी पुनर्मूल्यांकनासाठी अर्ज दाखल केले. अशीच परिस्थिती पुणे, नागपूर आणि औरंगाबाद बोर्डाबाबत असल्याचे सांगितले जाते. म्हणजे एकूणच या निकालात त्रूटी असल्याने पुनर्मूल्यांकनासाठी अर्ज करणाऱ्यांची मोठीच झुंबड उडालेली दिसते. उत्तरपत्रिका कठोरपणे तपासल्या गेल्या असा काही त्याचा सरसकटपणे निष्कर्ष काढता येणार नाही. कारण अलिकडचा विद्यार्थी हा अधिक चौकस आणि चाणाक्ष झाला आहे. तो पेपर देऊन आल्यानंतर त्याला अपेक्षित असणाऱ्या गुणांची गोळाबेरीज करून ठेवतो. त्याच्या अलिकडे पलिकडे दोन चार मार्क कमी जास्त पडले तर तो तिकडे दुर्लक्ष करतो. परंतु अनेक विद्यार्थ्यांच्याबाबतीत तब्बल वीस ते पंचवीस गुणांचा फरक झाल्याने विद्यार्थ्यांमध्ये नाराजी पसरलेली आहे. इतक्या मोठ्या संख्येने पुनर्मूल्यांकनासाठी अर्ज येण्याची ही पहिलीच वेळ असू शकते. आपल्याला मिळालेल्या गुणांविषयीचे ते असमाधान असेलही. परंतु त्यापेक्षाही परीक्षा मंडळाच्या कारभारावरचा हा अविश्वास हे त्यामागचे सर्वात मोठे कारण वाटते. मंडळाचा कारभार जर हमीपात्र असता तर ती वेळ आली नसती. यापूर्वी विद्यार्थ्यांना आलेले अनुभव लक्षात घेता त्यांनी पुनर्मूल्यांकनाचा पर्याय ताबडतोब निवडलेला दिसतो. बारावीसारख्या अतिशय महत्वाच्या परीक्षांबाबत जर या पध्दतीचा हलगर्जीपणा केला गेला असेल तर ते अतिशय गंभीर म्हणावे लागेल. गेल्या काही वर्षात निकाल गोंधळाची ही परंपरा राज्याच्या उच्चमाध्यमिक परीक्षा मंडळाने कायम ठेवलेली दिसते.

## निकाल गोंधळ पुढे चालू

यातली प्रमुख अडचण अशी आहे की सायन्सच्या विद्यार्थ्यांना या निकालांवर आधारित आपल्या पुढच्या भवितव्याचा मार्ग निवडायचा असतो. मेडिकल, इंजिनिअरिंगला जाणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता प्रवेश परीक्षा जरी महत्वाच्या असल्या तरीसुध्दा आपण बारावीच्या गुणवत्तेमध्ये कमी नाही आणि त्यातही पीसीबी, पीसीएम यामध्येही मार्क चांगले असणे अनेक विद्यार्थ्यांना गरजेचे वाटत असते. थोडक्यात सांगायचे तर आपल्या पुढच्या अभ्यासक्रमामध्ये गुणांमधली कमतरता अडचण ठरू नये हा त्यामागचा प्रमुख उद्देश असतो. त्यात पुन्हा वर्षभर मेहनत करून केवळ परीक्षकांच्या किंवा उत्तरपत्रिका तपासणाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे जर पाणी पडत असेल तर ते का सहन करायचे असाही मूलभूत प्रश्न निर्माण होतो. कारण एकीकडे विद्यार्थ्यांचा गुणवत्तेसाठी संघर्ष आणि स्पर्धा सुरु असते. तर दुसरीकडे परीक्षा मंडळ जर हलगर्जीपणा दाखवून त्यांच्या भवितव्याचाच खेळ करताना दिसते. अशावेळी आपल्या या मेहनतीचे योग्य फळ मिळालेच पाहिजे. या हेतूने पुनर्मूल्यांकनासाठी विद्यार्थ्यांची झुंबड उडताना दिसते आहे. बारावीच्या विद्यार्थ्यांना एकाचवेळी प्रवेश परीक्षा आणि उच्चमाध्यमिक शालांत परीक्षा अशा दोन्हींचा अभ्यास करायचा असतो. खरे तर त्यांच्यावर हा कितीतरी मोठा अन्याय होतो. बारावीच्या परीक्षेत कितीही चांगले गुण मिळवले आणि प्रवेश परीक्षेत जर योग्य टक्केवारी मिळाली नाही तर वर्षभर केलेल्या मेहनतीवरही पाणी पडते. या सर्व गोष्टींचा शिक्षणाशी थेट संबंध असल्याने तिथला हा सावळा गोंधळ किती दिवस सहन करायचा असाही प्रश्न निर्माण होतो. आता पूर्वीसारखे दिवस राहिलेले नाहीत. आजच्या स्पर्धेच्या युगात एकेक मार्कासाठी विद्यार्थी प्रयत्न करत असतो. याचा अर्थ त्याला शिक्षण आणि गुणवत्ता यातला फरकही लक्षात आला आहे. नुसतेच शिक्षण घ्यायचे असते तर त्याने एक दोन मार्काचा विचार केला नसता. परंतु सध्या गुणवत्तापूर्ण स्पर्धा असल्याने तो एकेक दोन दोन मार्कांचादेखील गंभीरपणे विचार करत असतो. यापूर्वी पुनर्मूल्यांकनासाठी ज्यांनी ज्यांनी अर्ज केले त्यातले किमान वीस पंचवीस टक्के लोकांनातरी गुण वाढवून मिळाल्याचा तरी अनुभव आलेला आहे.

## सीबीएससीची कार्यपध्दती

विशेष म्हणजे गेल्याच महिन्यात सीबीएससीच्या बारावीच्या परीक्षेचा निकाल लागला. त्यामध्ये पुनर्मूल्यांकनासाठी इतक्या मोठ्या प्रमाणात अर्ज आलेले नाहीत. पण राज्य परीक्षांबाबत असे का घडावे याचा राज्य शिक्षण विभागाने गंभीरपणे विचार करायला हवा. सीबीएससीची उत्तरपत्रिका तपासण्याची कार्यपध्दती खूपच आदर्श स्वरुपाची आहे. विद्यार्थ्यांची एकूण संख्या आणि त्याच्या प्रमाणात पुरेसे परीक्षक नेमले जातात. आणि केवळ दहा पंधरा दिवसामध्ये उत्तर पत्रिका तपासून होतील अशा प्रकारचे वेळापत्रकही मांडले जाते. कुठेही फारसा गोंधळ किंवा चुका पाहायला मिळत नाही. राज्य परीक्षा मंडळाने त्या पध्दतीचा आवर्जून अभ्यास करावा. जे परीक्षा मंडळ विद्यार्थ्यांची गुणवत्ता ठरण्याचे काम करते. त्या परीक्षा मंडळाचीच गुणवत्ता घसरत असेल तर ते आणखीनच चिंताजनक म्हणावे लागेल. हा प्रकार दरवर्षी होत असल्याने तो फार काळ चालू ठेवणे एकूणच शिक्षण नावाच्या व्यापकहिताला धक्का पोहचवणारे ठरू शकते. आतादेखील राज्य परीक्षा मंडळाने पुनर्मूल्यांकनासाठी दाखल झालेल्या अर्जांची तातडीने तपासणी करावी. आणि प्रवेश परीक्षांच्या निकालापूर्वी हा निकालही जाहीर करावा. ज्यामुळे विद्यार्थ्यांच्या मेहनतीचे चीज होऊ शकेल. आणि सर्वात महत्वाचे म्हणजे इतक्या संख्येने अर्ज येणे ही गोष्ट मंडळाच्या गुणवत्तेला बाधा आणणारी आहे हे लक्षात घेऊन त्यात सुधारणा करण्याची तयारी मंडळाने दाखवली पाहिजे.